# बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षीक अहवाल

## 2016–2017

# वार्षिक अहवाल

## राष्ट्रीय सेवा योजना

### २०१६-२०१७

सन २०१६-२०१७ या शैक्षिणिक वर्षात आमच्या माघाविद्यालयात ७२ मुली व ७० मुलांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभाग नोंदविला दिनांक १८-०८-२०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांच्या अद्याक्षतेखाली पार पडला श्री. विनोद गादेकर यांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे व महत्व पटून सांगितले . दिनांक ०६-०९-२०१६ रोजी आमच्या विभागाच्या वतीने शिक्षक दिन समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी चे प्रा. अशोक पाटील यांनी मार्गदर्शन केले. या कायर्क्रमाचे अध्यक्ष स्थान प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी भूषविले.

दिनांक २४-०९-२०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमात कै. श. बा. पाटील उच्च माध्यमिक विद्यालय अनगर येथील प्रा. सत्यवान दाढे यांनी वायोवृधाच्या समस्या व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकाची कर्तव्य या वेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले. या कायर्क्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. के. पाटील हे होते.

आमचे महाविद्यालय हे वाणिज्य महाविद्यालय असल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने बँकिंग व्यवहार प्रणाली या विषयावर मा. देविदास तुळजापूरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले, या कायर्क्रमाचे अध्यक्ष शिवशक्ती बँकचे चेरमन डॉ. प्रकाश बुरबुटे हे होते तर या कार्यक्रमास प्राचार्य व. न. अिंगळे, प्रा. अशोक वाघमारे शिवशक्ती बँकचे संचालक व कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.

दिनांक ०२-१०-२०१६ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या कर्यक्रमात प्रा. ए. जी. फटे यांनी स्वयंसेवक विद्यार्थ्यांना चरित्रात्मक माहिती दिली या कायर्क्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. के. पाटील हे होते. दिनांक ०७-०१-२०१७ रोजी बार्शी पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक मा. गजेन्द्र मनसावले यांनी महिला सुरक्षा सप्ताह निमित्त मार्गदर्शन केले. यांनी मार्गदर्शन केले. या कायर्क्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. के.

पाटील हे होते, तर या कार्यक्रमास श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी चे डॉ. एस. डी. पवार हे उपस्थित होते.

दिनांक २५ जानेवारी रोजी मतदार जनजागृती रॅली चे आयोजन करण्यात आले तहसील कार्यालय व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने काढलेल्या रॅली मध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थिती दर्शिवली या रॅलीची सांगता बार्शी नगरपालिकेच्या समोरील प्रांगणात करण्यात आली. या वेळी बार्शी चे तसिलदार मा. श्री. ऋषिकेश शेळके, बार्शी नागर्पलीकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे उपस्थित होते. या रॅलीची दखल सी २४ तास या वृत्त वाहिनीने घेतली.


कर्मवीर मामासाहेब जगदाळे जयंती सप्ताहामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये ऐकून ३९ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तसेच कर्मवीर जयंती निमित्त आयोजित 'जनजारण फेरी' मध्ये स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दिनांक २२/१२/२०१६-२८/१२/२०१६ या दरम्यान मौजे धोत्रे ता. बार्शी या ठिकाणी आयोजित करण्यात आहे. या व्यतिरिक्त नियमित कार्यक्रमात परिसर स्वच्छता, वृक्ष लागवड, आरोग्य जागृती, समाज जागृती, कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

Programme Officer
National Service Scheme
S.P.Sulakha Commerce College, Barshi




राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन समारंभ. व्यासपीठावर प्रा. एन. के. हिप्परकर, प्रमुख पाहुणे श्री. विनोद गारेकर, प्राचार्य डॉ. एस. के. पाटील डॉ. गुणवंत सरवदे, प्रा. डॉ. एन. बी. काळे व प्रा. लोंढे बी. डी.




महिला सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यान प्रसंगी पोलीस निरीक्षक गजेंद्र मनसावाले व इतर मान्यवर



कर्मवीर जयंती निमित्त आयोजित 'रक्तदान शिबिर' उदघाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील व रामभाई शाह रक्तपेढीचे कर्मचारी.




'मतदार जनजागृती रॅली' उदघाटन प्रसंगी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, सचिव, जयकुमार शितोळे व मान्यवर.



मतदार, जनजागृती रॅली झेंडा दाखवताना तहसिलदार श्री ऋषिकेश शेळ




'मतदार जनजागृती रॅली' सहभागी विद्यार्थी




राजमाता जिजाऊ जयंती समारंभ




राज्यस्तरीय शिबिरामधील सहभागी विद्यार्थी

# बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबीर

## अहवाल

## 2016–2017

# राष्ट्रीयसेवा योजना शिबिर अहवाल सन २०१६-१७

राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उदघाटन गुरुवार दिनांक 22 डिसेंबर 2016 रोजी झाले. या उद्धाटन सोहळ्याला उदघाटक म्हणून मा. श्री जयकुमार शितोळे सचिव श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी. हे लाभले होते. तसेच प्रमुख वक्ते प्राचार्य हरिदास फेरे वसंतराव काळे महाविद्यालय ढोकी यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांनी भूषविले. प्रमुख उपस्थित सौ. सुमनताई जाधवर सरपंच धोत्रे या होत्या.

दिनांक 23/12/2016 सकाळी०६;००-०८:०० व्यायाम, प्रार्थना, हजेरी, अल्पउपहारनंतर०८:३०-१२:३० या वेळेत सर्व स्वयंसेवकांनी उस्फुर्तपणे श्रमदान केले. श्रमदान म्हणून तेथील तलावातील गाळ काढला. दुपारी०१:००-०३:०० या वेळेत भोजन व विश्रांती घेतली. दुपारी०३:००-०५:३० या वेळेत सर्व स्वयंसेवकांची गट चर्चा घेण्यात अली. सायंकाळी ०६:००-०७:३० या वेळेत डॉ. संदीप तांबारे येडाई व्यसनमुक्ती केंद्र, येरमाळा यांच्या सोबत व्यसनमुक्ती रॅली गावातून काढण्यात अली व गावकऱ्यांना व्यसनापासून दूर राहावे व स्वतःचा व गावाच्या विकासात मदत करावी अशा प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारत पोळ माझी सैनिक, धोत्रे गाव हे होते. त्यांनी हि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. रात्री ०८:००-०९:०० या वेळेत भोजन होते . नंतर ०९:००-१०:०० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी करण्यात येत होती.

दिनांक २४/१२/२०१६ सकाळी ०६:००-०८:०० व्यायाम, प्रार्थना, हजेरी, अल्पउपहार नंतर ०८:३०-१२:३० यावेळेत सर्व स्वयंसेवकांनी उस्फुर्तपणे श्रमदान केले. श्रमदान म्हणून तेथील तलावातील गाळ काढला. दुपारी ०१:००-०३:०० या वेळेत भोजन व विश्रांती घेतली. दुपारी ०३:०० वाजता मुलानी एन. बी. सामाजिक वनीकरण विभाग यांचे वृक्षलागवड वसंवर्धन काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन झाले या कार्यक्रमासाठी समीर पठाण सामाजिक कार्यकर्ता धोत्रे हे अध्यक्ष होते. तसेच सायंकाळी ०६:०० वाजता गावकरी लोकांसाठी बाबासाहेब लोंढे यांचे कथाकथन झाले. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष वामन जाधवर गुरुजी हे होते. रात्री ०८:००-०९:०० या वेळेत भोजन होते . नंतर ०९:००-१०:०० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमाची तयारी करण्यात येत होती.

दिनांक २५/१२/२०१६ सकाळी ०६;००-०८:०० व्यायाम, प्रार्थना, हजेरी, अल्पउपहारनंतर ०८:३०-१२:३० यावेळेत सर्व स्वयंसेवकांनी उस्फुर्तपणे श्रमदान केले. श्रमदान म्हणून तेथील तलावातील गाळ काढला. दुपारी ०१:००-०३:०० या वेळेत भोजन व विश्रांती घेतली. दुपारी ३:०० वाजता प्रशांत माने धान फाऊंडेशन यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेतून सामाजिक क्षेत्रातील करिअरच्या संदी या विषयावर स्वयंसेवकांशी संवाद साधला. सायंकाळी 6 वाजता गावकाऱ्यांसमवेत खंडू जगताप गुरुजी यांचे आजचा तरुण व अद्यात्मया विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमात तात्यासाहेब घावटे सर हे अध्यक्ष होते. रात्री ०८:००-०९:०० या वेळेत भोजन होते .

दिनांक २६/१२/२०१६ सकाळी ०६;००-०८:०० व्यायाम, प्रार्थना, हजेरी, अल्पउपहार नंतर ०८:३०-१२:३० या वेळेत सर्व स्वयंसेवकांनी उस्फुर्तपणे श्रमदान केले. श्रमदान म्हणून तेथील तलावातील गाळकाढला. व तेथील प्राथमिक शाळेतील प्रांगणातील वृक्षाच्या बुडाला तो गाळ टाकण्यात आला. दुपारी ०१:००-०३:०० या वेळेत भोजन व विश्रांती घेतली. दुपारी ३:००-७:३० पर्यंत जगदाळे मामा हॉस्पिटल, बार्शी यां च्यातर्फेगावात आरोग्यचिकित्सा शिबीर घेण्यात आले. रात्री ०८:००-०९:०० या वेळेत भोजन होते .

दिनांक २७/१२/२०१६ सकाळी ०६:००-०८:०० व्यायाम, प्रार्थना, हजेरी, अल्पउपहार नंतर ०८:३०-१२:३० या वेळेत सर्व स्वयंसेवकांनी उस्फुर्तपणे श्रमदान केले. श्रमदान म्हणून गावातील ग्राम स्वच्छता घेण्यात स्वयंसेवकांनी त्यात आनंदाने सहभाग घेतला व सर्व गावातील स्वच्छता केली. दुपारी जेवणानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाची रंगीत तालीम घेण्यात आली. व तयारी केली. सायंकाळी ६:०० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे जेष्ठ प्रा. ए. जी. फटे यांच्या हस्ते करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमात स्वयंसेवकांनी हागणदारीमुक्त गाव, व्यसनमुक्त समाज, शिक्षणाचे महत्व, वृक्षसंवर्धन, मुलगी वाचवा समाजवाचावा, मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, अशा विविध विषयावर, पथनाट्य, मुकनाट्य, लघुनाट्य अशा विविध कला प्रकारात सादर केले.

२८/१२/२०१६ रोजी सकाळी ११ वाजता समारोपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याला प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. बी. ई. साठे गटविकास अधिकारी पंचायत समिती बार्शी हे लाभले होते तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील हे होते. या कार्यक्रमाला धोत्रे गावचे सरपंच उपसरपंच तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम सुरु होण्या पूर्वी सर्व पदादिकार्यानी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाची पहाणी केली. सर्व पाहुण्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचे कौतुक केले. अशा तऱ्हेने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर सन २०१६-१७ मौजे धोत्रे या गावी यशस्वी पार पडले.


Programme Officer
National Service Scheme
B.P.Sulakhe Commerce College, Barshi




मौजे धोत्रे 'विशेष श्रमसंस्कार शिबिरासाठी जात असताना स्वयंसेवक विद्यार्थी





'विशेष श्रमसंस्कार शिबीर' उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. जयकुमार शितोळे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील व मान्यवर



मौजे धोत्रे 'विशेष श्रमसंस्कार शिबिर' श्रमदान करताना - स्वयंसेवक विद्यार्थी




श्रमसंस्कार शिबिर श्रमदान करताना स्वयंसे
विद्यार्थी




विशेष श्रमसंस्कार शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना
श्री. प्रशांत माने व मान्यवर




विशेष श्रमसंस्कार शिबीर मार्गदर्शन करताना
मा. श्री. खंडू जगताप गुरुजी.



वनसंवर्धना विषयी मार्गदर्शन करताना मा. श्री. एन. बी. मुलाणी.




कथाकथन करताना मा. श्री. बाबासाहेब कोंढे.




श्रमदान करताना विद्यार्थी




'सहभोजनाचा आस्वाद घेत असताना स्वयंसेवक विद्यार्थी.





'विशेष श्रमसंस्कार शिबीर' व्यसनमुक्ती संबंधी मार्गदर्शन करताना श्री येडाई व्यसनमुक्तीचे डॉ. संदीप लांबारे व मा. व्यासपीठावर उपस्थित मान्यवर




श्रमदान करताना विद्यार्थी




आरोग्य तपासणी शिबीर उद्घाटन प्रसंगी मामा
जगदाळे मामा हॉस्पीटल बार्शीचे वैद्यकीय अधिक्षक
डॉ. जगताप व इतर मान्यवर





य तपासणी शिबीरादरम्यान जगदाळे मामा
ल बार्शीचा स्टाफ-




मौजे धोंडे शिबिरादरम्यान 'ग्रामसफाई' करताना स्वयंसेवक विद्यार्थी



ग्रामसफाई करताना स्वयंसेवक



शिबीर समारोप समारोह मार्गदर्शन करताना
प्राचार्य डॉ. एन्. के. पाटील




शिबीर समारोप मार्गदर्शन करताना बार्शीचे
गटविकास अधिकारी श्री. साठे बी. ई.